# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


दिनांक 25/01/2024 (गुरूवार) दुपार

---

### मातोश्री काशीदेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय मुसेवाडी येथे सांस्कृतिक व प्रजासत्ताक दिन कार्यक्रम (स्नेहसंमेलन) संपन्न

मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार यांनी दिनांक २५/०१/२०२४ रोजी मातोश्री काशीदेवी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय मुसेवाडी येथे सांस्कृतिक व प्रजासत्ताक दिन कार्यक्रम (स्नेहसंमेलन) आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमात मा. पोलीस अधीक्षक यांनी भेट देऊन शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थीनींना ड्रग्स व सोशल मीडिया याचे होणारे दुष्परिणाम बाबत महत्वाचे मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष ए. पोद्दार, पोलीस स्टेशन रामटेक येथील पोलीस निरीक्षक ह्दयनारायण यादव, उदयसिंग उर्फ गजू यादव (माजी उपसभापती पंचायत समिती रामटेक), सोहनलाल यादव (संस्थापक अध्यक्ष), हरीष उईके (जिल्हा परीषद सदस्य ), रणविर यादव (सरंपच खैरी विजेवाडा), विद्यार्थी पालकवर्ग उपस्थित होते.





## जनावरांची अवैधरीत्या वाहतूक करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

## पोलीस स्टेशन रामटेकची कारवाई

दिनांक २४/०१/२०२४ चे २०.०५ वा. दरम्यान पोस्टे रामटेके येथील पोलीस पथक पोलीस ठाणे परिसरात पेट्रोलींग करीत असताना मुखबीरद्वारे खात्रीशीर माहिती मिळाली की, हिवरा ते साटक रोडने कत्तलीकरीता अवैध्यरित्या जनावरांची वाहतुक होत आहे. अश्या मिळालेल्या माहितीवरुन हिवरा ते साटक रोडवर नाकाबंदी केली असता टाटा योध्दा क्र. एम एच ३०/बि.डी. –३८६५ व महिंद्रा पिकअप क्र. एम. एच.– ४०/बी.जी. ७१०२ येतांना दिसले. सदर वाहनाला थांबविले असता सदर वाहनाची तपासणी केली असता दोन्ही वाहनामध्ये असलेले एकुण १८ जनावरे यांना अतिशय आखुड दोराने बांधुन अतिशय दाटीवाटीत कोंबुन बांधुन त्यांना कोणतीही बसण्याची व चारापाण्याची व्यवस्था न करता कत्तलीकरीता वाहतूक करतांना मिळुन आले. आरोपीतांच्या ताब्यातून एकुण १८ जनावरे किंमती १,७२,०००/– रु. व दोन्ही वाहन किंमती १०,००,०००/– रु असा एकुण ११,७२,०००/– रु. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. **आरोपी क्र. ०१) महिंद्रा बोलेरो पिकअप एम. एच.– ४०/बी.जी. ७१०२ चा चालक नारायण महादेव गोल्हार, वय ४३ वर्ष, रा. सुभाष वार्ड, रामटेक ता. रामटेक जि. नागपूर, २) टाटा योध्दा क्र. एम एच ३०/बि.डी. –३८६५ चा फरार चालकाचे नाव पिंटू रा. कद्रोडा, कामठी, ता. कामठी, जि. नागपूर ३) क्लिनर नामे– फैजान उर्फ मोहम्मद अबुतालीब वल्द मोहम्मद युसूफ, वय १९ वर्ष, भाजीमंडी कामठी** यांचेविरूद्ध पोस्टे रामटेक येथे कलम ११ (अ), (ड) (इ) (फ) प्राण्यांचा छळ प्रतिबंध अधिनियम १९६०, सहकलम ५ (अ), (ब), ९ प्राणी संरक्षण अधिनियम, सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही मा. पोलीस अधीक्षक सा. नागपूर (ग्रामीण) श्री. हर्ष पोद्दार (भा.पो.से.) तसेच अपर पोलीस अधीक्षक डॉ. श्री. संदीप पखाले साहेब यांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे रामटेक येथील ठाणेदार ह्दयनारायण यादव, पोलीस उपनिरीक्षक श्रीकांत लांजेवार, पोहवा गजानन माहुरे, अमोल इंगोले, मंगेश सोनटक्के, योगेश भुरे, पोंलीस अंमलदार धिरज खंते, शरद गिते यांनी केली.



पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर